Edit with WPS Office

# श्री. विठ्ठल रुख्मिणी महाविद्यालय, सवना ता. महागांव जि. यवतमाळ

## इतिहास अभ्यास मंडळ

### शैक्षणिक सत्र :- 2021-2022

### इतिहास अभ्यास मंडळ उदघाटन

## अहवाल

श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाप्रसंगी सर्वप्रथम वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हेमंत महल्ले हे होते. तर प्रमुख उद्घाटक म्हणून प्रा.डॉ सुरेल झोड ,प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शंकर ठाकरे हे होते. प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. निसर्ग आडे यांनी केली. त्यांनी प्रास्ताविकामध्ये इतिहास अभ्यास मंडळाच्या स्थापनेमागील उद्देश सांगताना असे सांगितले की विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक दृष्टिकोन निर्माण करणे. हे अभ्यास मंडळ शैक्षणिक सत्र 2021 -2022 साठी गठीत करण्यात आले आहे.या अभ्यास मंडळामार्फत शैक्षणिक सत्र 2021-2022 यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते जसे संत, समाजसुधारक, राजकीय नेते, स्वातंत्र्य चळवळीतील राजकीय पुढारी यांच्या जयंती, पुण्यतिथी वाद विवाद स्पर्धा, सेमिनार, शैक्षणिक सहल इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.त्यामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी हे अभ्यासमंडळ कार्यशील असते असे सांगितले.तसेच त्यांनी इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारिणी जाहीर केली इतिहास अभ्यास मंडळाच्या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष म्हणून कु.सुप्रिया पालकर , उपाध्यक्ष श्री.भीमराव बनसोड , सचिव कु. निकिता चोपडे , सदस्य विजय माने , कु पल्लवी टेकाळे, श्री. योगेश राठोड यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.त्यानंतर या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा.डॉ. सुरेल झोड यांनी उद्घाटन भाषणां मध्ये बोलताना असे सांगितले की इतिहास अभ्यास मंडळ हे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे आहे तसेच वर्तमान काळामध्ये एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून जीवन जगण्यासाठी सुद्धा इतिहासाची मानवी जीवनामध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समाजशास्त्र विषयाचे प्रा.शंकर ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले इतिहासाचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांना भूतकाळ वर्तमानकाळ यांची सांगड घालून इतिहासाचे अध्ययन करणे गरजेचे आहे असे सांगितले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये इतिहास अभ्यास मंडळाचे शैक्षणिक जीवनात काय महत्त्व आहे ते सांगितले तसेच या अभ्यास मंडळामार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला चालना मिळण्यासाठी हे अभ्यास मंडळ कार्यरत आहे असे सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील नॅक समन्वयक प्रा. शेख बिलाल प्रा.विलास चव्हाण प्रा. प्रदीप जयस्वाल प्रा. अनिल खाडे प्रा.स्वाती ताथोड प्रा.पंकज सा. चौधरी प्रा. पंकज वा. चौधरी प्रा. बगेल मॅडम , श्री. नंदू टेकाळे हे उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी हे सुद्धा उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नासिर शेख यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. बगेल मॅडम यांनी केले

Edit with WPS Office

# इतिहास अभ्यास मंडळ कार्यकारणी

| अ. क्र. | विद्यार्थीचे नाव | वर्ग | पदनाम |
|---|---|---|---|
| 1) | कु.सुप्रिया पालकर | बि. ए. भाग 3 | अध्यक्ष |
| 2) | श्री.भीमराव बनसोड | बि. ए. भाग 2 | उपाध्यक्ष |
| 3) | कु. निकिता चोपडे | बि. ए. भाग 3 | सचिव |
| 4) | श्री.विजय माने | बि. ए. भाग 2 | सदस्य |
| 5) | कु पल्लवी टेकाळे | बि. ए. भाग 1 | सदस्य |
| 6) | श्री. योगेश राठोड | बि. ए. भाग 1 | सदस्य |

# इतिहास अभ्यास मंडळ उद्घाटनातील छायाचित्रे






Edit with WPS Office

# इतिहास अभ्यास मंडळ उद्घाटनाची वर्तमानपत्रातील बातमी

## (विदर्भ मतदार )

# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन



**सवना (वार्ता) :** येथील श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी सर्वप्रथम वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले हे होते. तर प्रमुख उद्घाटक म्हणून प्रा. डॉ. सुरेल झोड, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. शंकर ठाकरे हे होते. प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. निसर्ग आडे यांनी केली. त्यांनी प्रास्ताविकामध्ये इतिहास अभ्यास मंडळाच्या स्थापनेमागील उद्देश सांगताना असे सांगितले की विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक दृष्टिकोन निर्माण करणे. हे अभ्यास मंडळ शैक्षणिक सत्र २०२१ - २०२२ साठी गठीत करण्यात आले आहे. या अभ्यास मंडळा मार्फत शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते जसे संत, समाजसुधारक, राजकीय नेते, स्वातंत्र्य चळवळीतील राजकीय पुढारी यांच्या जयंती, पुण्यतिथी वाद विवाद स्पर्धा, सेमिनार, शैक्षणिक सहल इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी हे अभ्यासमंडळ कार्यशील असते असे सांगितले. तसेच त्यांनी इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारिणी जाहीर केली इतिहास अभ्यास मंडळाच्या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष म्हणून कु. सुप्रिया पालकर, उपाध्यक्ष भीमराव बनसोड, सचिव कु. निकिता चोपडे, सदस्य विजय माने, कु. पल्लवी टेकाळे, योगेश राठोड यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा. डॉ. सुरेल झोड यांनी उद्घाटन भाषणांमध्ये बोलताना असे सांगितले की इतिहास अभ्यास मंडळ हे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी महत्वाचे आहे. तसेच वर्तमान काळामध्ये एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून जीवन जगण्यासाठी सुद्धा इतिहासाची मानवी जीवनामध्ये अतिशय महत्वाचे स्थान असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समाजशास्त्र विषयाचे प्रा.शंकर ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले इतिहासाचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांना भूतकाळ वर्तमानकाळ यांची सांगड घालून इतिहासाचे अध्ययन करणे गरजेचे आहे असे सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये इतिहास अभ्यास मंडळाचे शैक्षणिक जीवनात काय महत्त्व आहे ते सांगितले. तसेच या अभ्यास मंडळामार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला चालना मिळण्यासाठी हे अभ्यास मंडळ कार्यरत आहे असे सांगितले. या कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयातील नॅक समन्वयक प्रा. शेख बिलाल, प्रा. विलास चव्हाण, प्रा. प्रदीप जयस्वाल, प्रा. अनिल खाडे, प्रा. स्वाती ताथोड, प्रा.पंकज सा. चौधरी, प्रा. पंकज वा. चौधरी, प्रा. बगेल मॅडम, नंदू टेकाळे हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी हे सुद्धा उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नासिर शेख यांनी केले.